"कृपया प्रसिध्दी करिता

माहिती व जन संपर्क कार्यालय
पुणे महानगरपालिका
23/10/2026

(PRESS NOTE)

दिनांक: २२ ऑक्टोबर २०२६ स्थळ: पुणे

डेंग्यू व कीटकजन्य आजार प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी पुणे महानगरपालिका सज्ज; महापालिकेची धडक मोहीम व उपाययोजना सुरू

अतिरिक्त महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न; रुग्णालय व्यवस्थापन, तपासणी सुविधा आणि डासोत्पत्तीविरोधात कठोर कारवाईचे निर्देश

पुणे: पुणे शहरामध्ये डेंग्यू तसेच इतर कीटकजन्य आजारांच्या प्रतिबंध, नियंत्रण आणि क्षेत्रीय उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी मा.पवनीत कौर, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) पुणे महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली विशेष आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस महापालिकेचे आरोग्य प्रमुख, सहाय्यक आरोग्य प्रमुख, सर्व क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी (WMO), परिमंडळ वैद्यकीय अधिकारी (ZMO), जिल्हा हिवताप अधिकारी, तसेच बांधकाम आणि अतिक्रमण विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महत्त्वाची आकडेवारी आणि सद्यस्थिती (जानेवारी ते २० ऑक्टोबर २०२६)

- **एकूण बाधित रुग्ण:** जानेवारी ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत शहरात एकूण २४१३ डेंग्यू रुग्णांची नोंद झाली आहे (माहे ऑगस्ट: ५६८, सप्टेंबर: ७२६, आणि ऑक्टोबर: ५५३ रुग्ण).
- **गृह तपासणी मोहीम:** महापालिकेच्या पथकांनी सुमारे १४ लाख घरांमध्ये भेट देऊन २८,३१,३८६ कंटेनर/पाण्याच्या साठ्यांची तपासणी केली.
- **डासोत्पत्ती व कारवाई:** तपासणीदरम्यान १३,००० घरांमध्ये १८,८८५ कंटेनरमध्ये 'एडीस' डासांच्या अळ्या आढळल्या. याप्रकरणी २,६६४ मिळकतींना नोटिसा बजावण्यात आल्या असून रु. ६,३०,०००/- चा दंड वसूल करण्यात आला आहे.

बैठकीतील महत्त्वाचे निर्णय व प्रमुख मार्गदर्शक सूचना:

१. मोफत तपासणी व प्रयोगशाळा चाचण्या

- **RDK किट्सची उपलब्धता:** पुणे महापालिकेच्या सर्व दवाखान्यांमध्ये मोफत डेंग्यू निदानासाठी रैपिड डायग्नोस्टिक किट्स (RDK) उपलब्ध करण्यात आले आहेत.
- **कन्फर्मेटरी चाचण्या:** सेंटिनेल सेंटर्स (डॉ. नायडू रुग्णालय, डॉ. कोटणीस रुग्णालय, कमला नेहरू रुग्णालय) येथे सीरम सॅम्पल्स पाठवून मोफत कन्फर्मेटरी चाचण्यांची सोय करण्यात आली आहे.
- **IHIP पोर्टल नोंदणी:** सर्व खाजगी व शासकीय रुग्णालयांनी रुग्णांची माहिती IHIP पोर्टलवर नोंदवणे अनिवार्य असून, दुबार नोंद (Double Entry) होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले आहेत.

२. रुग्णालय व्यवस्थापन व बेडची स्थिती

- **पुरेशी खाट उपलब्धता:** सद्यस्थितीत पुणे शहरात डेंग्यू उपचारासाठी खाजगी रुग्णालयांत ४,४०९ खाटा (६७० ICU खाटा) व महापालिका रुग्णालयांत ३३३ खाटा (६ ICU खाटा) उपलब्ध आहेत. सरासरी ५०% खाटा उपलब्ध असून नागरिकांनी केवळ ठराविक मोठ्या रुग्णालयांमध्येच उपचाराचा आग्रह धरू नये.
- डेंग्यू उपचारासाठी डॉ नायडू रुग्णालयात ५० स्वतंत्र खाटांची व्यवस्था करण्यात आली असून दररोज १० ते १५ खाटा वापरात असून ३५ खाटा रिक्त आहेत. डॉ नायडू रुग्णालयातील उपचार पूर्णपणे मोफत आहे.
- **गंभीर रुग्णांवर उपचार:** गंभीर लक्षणे असणाऱ्या रुग्णांवर तातडीने कमला नेहरू व नायडू रुग्णालयात उपचार सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सर्व डेंग्यू वॉर्ड्समध्ये रुग्णांसाठी मच्छरदाणीचा वापर अनिवार्य केला आहे.

३. क्षेत्रीय पर्यवेक्षण व कीटक प्रतिबंधक कारवाया

- **हॉटस्पॉट भागांवर भर:** ज्या भागात जास्त रुग्ण आढळत आहेत, तेथे प्राधान्याने औधध फवारणी व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवल्या जात आहेत.
- **धूरफवारणी (Fogging Protocol):** उघड्या जागेवर सरसकट धूरफवारणी न करता, रुग्णाच्या घरात व लगतच्या बंदिस्त परिसरात २० मिनिटे धूरफवारणी प्रभावी ठरेल अशा पद्धतीने करण्याचे निर्देश दिले आहेत.
- **जैविक अळीनाशक वापर:** पाणी कपात कालावधीत वस्त्यांमध्ये पाणी साठवले जात असल्याने, साठवलेल्या पाण्यात जैविक अळीनाशकांची सातत्याने फवारणी केली जाईल.

४. व्यापक जनजागृती मोहीम (IEC Campaign)

- **घंटागाड्यांवरून संदेश:** कचरा गोळा करणाऱ्या घंटागाड्यांवर दररोज डेंग्यू जनजागृतीची ऑडिओ क्लिप वाजवली जात आहे. सर्व १५ क्षेत्रीय कार्यालयांना ऑडिओ पेनड्राइव्ह वितरित करण्यात आले आहेत.
- **शाळा व सोसायट्यांमध्ये सहभाग:** गृहनिर्माण सोसायट्यांच्या अध्यक्षांना गच्ची व पाण्याच्या टाक्या स्वच्छ ठेवण्याबाबत पत्र पाठवले जात आहे. शाळांमध्ये निबंध व चित्रकला स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली जात आहे.
- **कोरडा दिवस पाळण्याचे आवाहन:** नागरिकांनी आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' (Dry Day) म्हणून पाळावा, जेणेकरून डासोत्पत्ती रोखता येईल.

नागरिकांना आवाहन:

पुणे महापालिकेमार्फत सर्व आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना कडकडीतपणे राबवल्या जात आहेत. नागरिकांनी आपल्या परिसरात कुठेही पाणी साचू न देता, पाण्याच्या टाक्या झाकून ठेवाव्यात आणि महापालिकेच्या तपासणी पथकांना पूर्ण सहकार्य करावे तसेच रुग्णालयामध्ये पुरेशा खाटा उपलब्ध असल्याने घाबरून जाऊ नये व डॉक्टरांच्या सल्याने वेळीच औषध उपचार करून घ्यावेत, असे आवाहन पुणे महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.